# नगर परिषद कार्यालय, गंगाखेड

ता. गंगाखेड जि. परभणी पिन कोड 431514 Email-mcgangakhed@gmail.com

जा.क्र. नपगं/2681/2022 दि. 18/11/2022

## कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक पद भरती बाबत जाहिरात

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण करिता नगर परिषद गंगाखेडसाठी शहर समन्वयकाचे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ ११ महिन्यांसाठी खालील नमुद केलेली कंत्राटी पद भरण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक त्या सर्व शैक्षणिक अर्हतेसह अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रासह तसेच रुपये 500/-ची पावती भरणा करून, अर्ज नमुना प्राप्त करुन नगर परिषद कार्यालय, गंगाखेड येथे दिनांक 28/11/2022 रोजी सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत सादर करावे. प्राप्त अर्जाचे नगर परिषद छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. एकूण 15 गुणांपैकी अनुभवास 7 गुण आणि मुलाखतीस 8 गुण (स्वच्छ भारत अभियानाविषयीचे ज्ञान 5 गुण आणि इतर 3 गुण) घेण्यात येईल.

| पदनाम | जागा | शैक्षणिक पात्रता | अर्ज कोणाकडे पाठवावा | अनुभव | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-Ordinator) | 1 | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी (1) बी.ई./बी.टेक (कोणतीही शाखा), (2) बी.आर्क, (3) बी. प्लॅनिंग (4) बी.एस.सी. (कोणतीही शाखा) | नगर परिषद कार्यालय, गंगाखेड जिल्हा परभणी पिन-431514 | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा कमीत कमी सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. | 45,000/- प्रतिमाह |

जाहिरातीत नमुद केल्यानुसार सदर पदाच्या अटी, शर्ती व शासकीय परिपत्रक कार्यालयीन वेळेत नगर परिषद गंगाखेड आरोग्य विभागात पाहणीसाठी उपलब्ध आहेत. अर्जाचा नमुना नगर परिषद गंगाखेड आरोग्य विभागात पाहावयास मिळेल.

**टीप :** सदर भरती ही राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांच्या परिपत्रकानुसार होत असून ती वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन परिपत्रकाच्या अधीन राहून असेल.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, गंगाखेड**